## निशाणी क्र. ७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ व नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन असे की,**

०२. वादी यांनी निरंतर मनाईहुकूम मिळणेबाबतचा दावा दाखल केला आहे. सदर दावा दाखल करतांना प्रतिवादी अवचितराव तेजराव मिसाळ हे मयत झाल्याबाबत वादी यांच्याकडून अनावधनाने सांगण्यात आले त्यामुळे अवचितराव तेजराव मिसाळ हे मयत तर्फे वारस असे दाव्यामध्ये नजरचुकीने नमूद केलेले असून प्रतिवादी क्र. १ म्हणुन अवचितराव तेजराव मिसाळ असे समाविष्ट करुन दाव्यात सदरची दुरुस्ती करण्याची विनंती वादींनी केली आहे. त्यामुळे अर्जात नमुद दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे अर्जाच्या मलपृष्ठावर दाखल करून सदरील अर्जावर आक्षेप नोंदविला आहे.

०४. अर्ज त्यावरील शपथपत्राचे अवलोकन करुन वादी यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्यामध्ये अर्जात नमूद दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व वादी, प्रतिवादी मधील वादाचे कायमचे निराकरण होण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे दाव्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता तसेच न्यायाच्या दृष्टीने अर्जात मागितलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. तथापि,

यातील वादींनी सदरचा दावा दाखल करतांना निष्काळजीपणा दाखविल्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी निशाणी क्र. ७ वरील अर्जात मागितलेली दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांमध्ये करावी व तशी दावा दुरुस्तीची प्रत दाव्याचे कामी दाखल करावी.

०३. वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये २००/– (रक्कम रुपये दोनशे फक्त) प्रतिवादी यांना द्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ROHINI VISHNU PATIL
Date: 2025.04.05 16:10:31 +0530

दिनांकः ०५.०४.२०२५ (श्रीमती आर. व्ही. पाटील)
भोकरदन. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन.

### प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः श्रीमती एस. आर. इंगळे,
न्यायालयाचे नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०५.०४.२०२५

स्वाक्षरीत/–
लघुलेखकाची सही